ISSN -2581-8848

# सांगली जिल्हयातील देवदासींचा सामाजिक व आर्थिक अभ्यास

**प्रा. डॉ. सुनंदा राम परीट**
**के. बी. पी. कॉलेज, इस्लामपूर**
**ता - वाळवा जि- सांगली**

**गोषवारा :** राष्ट्रीय मानवी हक्क समिती 2013 नुसार भारतातील देवदासींची संख्या जवळजवळ 4,50, 000 इतकी असल्याचे आढळून आले आहे. भारतीय समाजव्यवस्थेत अजूनही काही अनिष्ठ चालिरीती व परंपरा अस्तित्वात आहेत. देवदासींचा प्रश्न आज एक गंभीर प्रश्न बनला आहे. ही एक अमानवी क्रूर प्रथा आहे जिला दलित तसेच सर्वसाधारण कुटुंबातील तरुण स्त्रिया, पुरुष हजारोंच्या संख्येने बळी पडतात. अलीकडच्या काळात तर या देवाच्या दासी मुंबईसारख्या शहरातील वेश्या व्यवसायाशी एका दुष्टचक्राच्या माध्यमातून जोडल्या गेल्या आहेत. दैनंदिन जीवनातही देवदासींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. देवदासींच्या संदर्भात शिक्षणाचा अभाव, तुच्छतेची वागवणूक, अंधश्रध्देचा पगडा, शारीरिक शोषण, सुरक्षिततेचा अभाव इ. प्रकारच्या समस्या दिसून येतात. सदर संशोधन अभ्यासमध्ये देवदासी प्रथेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सांगली जिल्हयातील देवदासींची आर्थिक व सामाजिक स्थिती, समस्या व त्यावरील उपाययोजना इ. चा अभ्यास करणेत आला आहे.

**पारिभाषिक संज्ञा :** झुलवा, देवदासी, देवदासी प्रथा, अमानवी क्रूर प्रथा, अंधश्रध्देचा पगडा इ.

**प्रस्तावना :** राष्ट्रीय मानवी हक्क समिती 2013 नुसार भारतातील देवदासींची संख्या जवळजवळ 4,50, 000 इतकी असल्याचे आढळून आले आहे. भारतीय समाजव्यवस्थेत अजूनही काही अनिष्ठ चालिरीती व परंपरा अस्तित्वात आहेत. देवदासींचा प्रश्न आज एक गंभीर प्रश्न बनला आहे. ही एक अमानवी क्रूर प्रथा आहे जिला दलित तसेच सर्वसाधारण कुटुंबातील तरुण स्त्रिया, पुरुष हजारोंच्या संख्येने बळी पडतात. अलीकडच्या काळात तर या देवाच्या दासी मुंबईसारख्या

शहरातील वेश्या व्यवसायाशी एका दुष्टचक्राच्या माध्यमातून जोडल्या गेल्या आहेत. दैनंदिन जीवनातही देवदासींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. देवदासींच्या संदर्भात शिक्षणाचा अभाव, तुच्छतेची वागवणूक, अंधश्रध्देचा पगडा, शारीरिक शोषण, सुरक्षिततेचा अभाव इ. प्रकारच्या समस्या दिसून येतात. सदर संशोधन अभ्यासमध्ये देवदासी प्रथेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सांगली जिल्हयातील देवदासींची आर्थिक व सामाजिक स्थिती, समस्या व त्यावरील उपाययोजना इ. चा अभ्यास करणेत आला आहे.

**अभ्यासाची उदिष्टये :** सदर संशोधन अभ्यासासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

1) देवदासी प्रथेची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

2) देवदासींच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

3) देवदासींना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

4) देवदासींचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

**गृहितक :** सांगली जिल्हयातील देवदासींचा सामाजिक व आर्थिक दर्जा मागासलेला आहे.

**संशोधन पध्दती :** सदर संशोधन अभ्यासासाठी सांगली जिल्हयातील इस्लामपूर, शिराळा, जत, सांगली या भागांचा अभ्यासक्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे. सांगली जिल्हयातील देवदासींची कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये स्वतंत्र अशी नोंद असल्याचे आढळून येत नाही. सांगली जिल्हयात सुमारे 300 देवदासी आहेत. या संख्येमधील १०% म्हणजे 30 देवदासींची निवड साध्या नमूना निवडीनुसार सदर अभ्यासासाठी करणेत आली आहे.

**प्रायमिक सामग्री :** सदर संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या सामग्री व माहितीचा वापर करण्यात आला आहे. प्रत्यक्ष मुलाखतीच्या माध्यमातून प्राथमिक माहिती गोळा करणेत आली आहे.

**दुय्यम सामग्री :** दुय्यम स्वरूपाची माहिती विविध संदर्भग्रंथ, इंटरनेटवरील विविध संकेतस्थळे, वर्तमानपत्रातील लेख इ. च्या माध्यमातून मिळवली आहे.

**मर्यादा :** सदर संशोधन पेपर हा पूर्णपणे प्राथमिक सामग्रीवर आधारित असून यातील निष्कर्ष इतर कोणत्याही ठिकाणच्या परिस्थितीस लागू असणार नाहीत शिवाय देवदासींकडून पुरेशी माहिती देण्यास सहकार्य मिळत नसल्याने अधिकची माहिती मिळवण्यात अडथळे आले.

**देवदासी प्रथेची ऐतिहासिक पार्श्वभूमी :** 'देवदासी' हा शब्द प्रथम कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात समाविष्ट केला. तसेच मत्स्यपुराण, विष्णूपुराण यामध्येही देवदासीचा उल्लेख आढळतो. बौध्द वाड्मयातही देवदासी हा शब्द आढळतो. पाचव्या शतकामध्ये बुध्दघोसाने हा शब्द वापरला आहे. देवदासींची प्रथा मध्ययुगात खूपच वाढली. 1351 मध्ये भारताला भेट दिलेल्या अरेबियातील दोन मुस्लिम प्रवाशांनी भारतातील वेश्यांना देवदासी म्हटले आहे. ते म्हणतात. "एखाद्या स्त्रीने मूल होण्यासाठी नवस केला असला आणि तिला सुंदर मुलगी झाली तर ती तिला 'बोंड' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मूर्तीकडे नेले जाते आणि तिथेच तिला सोडून दिले जाते. भारतातील शास्त्रीय नृत्यामध्ये अत्यंत प्रतिष्ठा असलेल्या भरतनाट्यम, कुचीपुडी आणि ओडीसी या नृत्यप्रकारांचा उगम देवदासी प्रथेमध्ये आहे.

**सांगली जिल्हयातील देवदासींचे स्थान :** सांगली जिल्हयातील प्रामुख्याने ग्रामीण भागात या देवदासींची संख्या जास्त असल्याचे आढळले आहे. देवीचे मंदिर असलेल्या ठिकाणी उदा. जत, सोनी, भोसे इ. उदरनिर्वाहासाठी उत्पन्न मिळेल अशा ठिकाणी विशेषत: ग्रामीण भागामध्ये शिराळा, वाळवा, कामेरी, कासेगाव इ. ठिकाणी देवदासी आढळतात. जोगवा मागण्यासाठी बाजार, मंदिराच्या आवारात उरुस, यात्रा, इ. ठिकाणी देवदासींचा वावर आढळतो. मंगळवार आणि शुक्रवार देवीचा वार माणून देवदासी जोगवा मागताना आढळतात तसेच पौर्णिमेच्या

दिवशीही ते जोगवा मागताना दिसतात. जत येथील श्री. यल्लम्मा देवीचे मंदिर परिसरात देवदासींचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते.

**कौटूंबिक पार्श्वभूमी :** सांगली जिल्हयातील देवदासींच्या कुटूंबाची पार्श्वभूमी तक्ता क्र. 1 मध्ये दर्शवली आहे.


**तक्ता क्र. 1**

**कौटुंबिक पार्श्वभूमी**

| **अ.क्र.** | **कौटुंबिक पार्श्वभूमी** | **देवदासींची संख्या** | **टक्केवारी (%)** |
|---|---|---|---|
| 1 | अत्यंत हलाखीची/ निकृष्ठ | 12 | 40.00 |
| 2 | मध्यम स्वरुपाची | 08 | 26.67 |
| 3 | उच्च दर्जाची | 03 | 10.00 |
| 4 | माहीत नाही | 07 | 23.33 |
| **एकूण =** | | **30** | **100** |

संदर्भ : प्रत्यक्ष भेट

यामध्ये अत्यंत हलाखीची/निकृष्ठ स्वरुपाची कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या देवदासींची संख्या सर्वाधिक म्हणजे 40% असल्याचे आढळून आले. याखालोखाल मध्यम वर्गातील देवदासींची संख्या 26.67% असल्याचे दिसून आले.




अत्यंत हालाखीची/ निकृष्ठ स्वरुपाची पार्श्वभूमी असलेल्या देवदासींची संख्या उच्च दर्जाची कौटुंबिक पार्श्वभूमी असलेल्या देवदासींच्या प्रमाणापेक्षा चारपाटीने अधिक असल्याचे आढळून आले. 23.33% देवदासींनी आपली कौटुंबिक पार्श्वभूमी आठवत नाही व माहीत नसल्याचे संगीतले.

**शैक्षणिक स्थिती :** सदर अभ्यासासाठी निवडलेल्या देवदासींची शैक्षणिक स्थिती तक्ता क्र. 2 मध्ये दर्शविली आहे. सर्वाधिक देवदासींचे शिक्षणच झालेले नाही असे मुलाखती दरम्यान आढळून आले आहे.

**तक्ता क्र. 2**

**शैक्षणिक पार्श्वभूमी**

| अ.क्र. | शैक्षणिक स्थिती | देवदासींची संख्या | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1 | अशिक्षित | 14 | 46.67 |
| 2 | प्राथमिक | 09 | 30.00 |
| 3 | माध्यमिक | 07 | 23.33 |
| 4 | पदवी | 00 | 00.00 |
| **एकूण =** | | **30** | **100** |

संदर्भ :- प्रत्यक्ष भेट

46.67% देवदासी अशिक्षित असल्याचे दिसून आले व माध्यमिकपर्यंत शिक्षण घेतलेल्या देवदासींच्या प्रमाणापेक्षा हे प्रमाण दुपटीपेक्षा अधिक असल्याचे दिसून आले. प्राथमिकपर्यंत शिक्षण घेतल्याचे 30% देवदासीनी संगितले. उच्च शिक्षण घेतलेली एकही देवदासी मुलाखतीदरम्यान आढळून आली नाही.

**अशिक्षितपणाची कारणे :** देवदासी अशिक्षित असण्याची कारणे तक्ता क्रं. ३ मध्ये दाखवली आहेत. नमूना निवड केलेल्या एकूण देवदासीपैकी ४६.६७% च देवदासी अशिक्षित असल्याचे (तक्ता क्रं.2) दिसून आले. तथापि, देवदासी अशिक्षित असण्यामागची कारणे याबाबत सर्वांचेच मत जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

आर्थिक परिस्थिती शिक्षण घेण्यास अनुकूल नसल्यामुळे शिक्षण घेता येत नसल्याचे मत 30% देवदासीनी व्यक्त केले तर शिक्षणाबद्दल अनास्था असल्यामुळे देवदासी अशिक्षित राहतात असे 43.33% देवदासीनी सांगितले. कौटुंबिक पार्श्वभूमी शिक्षण घेण्यास प्रतिकूल असल्यामुळे व शाळेत प्रवेश मिळत नाही यामुळे देवदासी शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे मत अनुक्रमे 16.67% व 10% देवदासीनी व्यक्त केले.

**तक्ता क्र.3**

**अशिक्षितपणाची कारणे**

| **अ.क्र.** | **अशिक्षितपणाची कारणे** | **देवदासींची संख्या** | **टक्केवारी (%)** |
|---|---|---|---|
| 1 | आर्थिक परिस्थिती | 09 | 30.00 |
| 2 | शिक्षणाबद्दल अनास्था | 13 | 43.33 |
| 3 | कौटुंबिक पार्श्वभूमी | 05 | 16.67 |
| 4 | शाळेत प्रवेश मिळत नाही | 03 | 10.00 |
| **एकूण =** | | **30** | **100** |

संदर्भ :- प्रत्यक्ष भेट


**निवासस्थान :** देवदासी देवाच्या सेवक आहेत अशीच त्यांची समाजामध्ये ओळख आहे. या देवदासींचे निवासस्थान तक्ता क्रं. 4 मध्ये दाखवण्यात आले आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या देवदासींचे प्रमाण 43.33% इतके दिसून आले तर देवस्थान किंवा मंदीर परिसरात वास्तव्य करणाऱ्या 36.67% देवदासी आढळून आल्या. रहिवासाचे निश्चित ठिकाण नसल्याचे 20% देवदासीनी सांगितले.

**तक्ता क्र. 4**

**निवासस्थान**

| **अ.क्र.** | **निवासस्थान** | **देवदासींची संख्या** | **टक्केवारी (%)** |
|---|---|---|---|
| 1 | ग्रामीण भागात | 13 | 43.33 |
| 2 | देवस्थानाच्या ठिकाणी | 11 | 36.67 |
| 3 | निश्चित ठिकाण नाही | 06 | 20.00 |
| **एकूण =** | | **30** | **100** |

संदर्भ :- प्रत्यक्ष भेट




**उदरनिर्वाहाचे साधन :** देवदासींचे उदरनिर्वाहाचे साधन तक्ता क्र. 5 मध्ये दर्शवण्यात आले आहे. जोगवा मागणे हे उदरनिर्वाहाचे साधन असल्याचे 26.66% देवदासींनी सांगितले तर जागरण कार्यक्रम व जोगवा मागणे यावर उदरनिर्वाह करत असल्याचे 30% देवदासींनी सांगितले. सर्वाधिक 36.67% देवदासी देवाची कामे (पूजा) करून उत्पन्न मिळवतात व आपला उदरनिर्वाह करतात तर इतर मार्गांनी उदरनिर्वाह करणाऱ्या देवदासींचे प्रमाण 6.67% असल्याचे सदर अभ्यासात दिसून आले.

**तक्ता क्र. 5**

**उदरनिर्वाहाचे साधन**

| **अ.क्र.** | **उदरनिर्वाहाचे साधन** | **देवदासींची संख्या** | **टक्केवारी (%)** |
|---|---|---|---|
| 1 | जोगवा मागणे | 08 | 26.66 |
| 2 | जागरण कार्यक्रम व जोगवा मागणे | 09 | 30.00 |
| 3 | देवाची कामे (पूजा) करून उत्पन्न मिळवणे | 11 | 36.67 |
| 4 | इतर | 02 | 6.67 |
| **एकूण =** | | **30** | **100** |

संदर्भ :- प्रत्यक्ष भेट




**देवदासी प्रथा आणि कायदा :** सर्व नागरिकांना समतेचा आणि स्वतंत्र्याचा हक्क आहे. घटनेच्या कलम 14 नुसार सर्व नागरिक कायद्यापुढे समान आहेत. कलम 15 नुसार भेदभाव न करणे, कलम 16 नुसार सर्व क्षेत्रात समान संधी, कलम 17 नुसार अस्पृश्यता नष्ट करणे तसेच कलम 21 नुसार जीवित स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे. कलम 30 नुसार शिक्षणाचा हक्क देण्यात आला आहे. देवदासी प्रथेविरुध्द स्वातंत्र्यपूर्वकाळात आणि स्वातंत्र्यानंतरही अनेक कायदे करण्यात आले. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे:

1) देवदासीनी देवळात नृत्य केलेच पाहिजे अशी सक्ती रद्द करणारा म्हैसूर सरकारचा कायदा 1993

2) नृत्यावर बंदी घालणारा म्हैसूर सरकारचा कायदा 1909

3) देवदासी प्रथेचे उच्चाटन करणारा म्हैसूर सरकारचा कायदा 1922

4) मुंबई देवदासी संरक्षण आणि देवदासी प्रथेचे निर्मूलन कायदा 1934

5) देवदासी प्रथेला बंदी घालणारा आणि या कायद्याने शिक्षेची तरतूद असलेला कर्नाटक सरकारचा कायदा 1983

6) महाराष्ट्र देवदासी निर्मूलन अधिनियम 2006

 ISSN -2581-8848

शासनाने या प्रथेची गंभीर दखल घेऊन देवदासी व मुरळी प्रतिबंध कायद्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी 25 फेब्रुवारी 1983 रोजी काँग्रेस पक्षाच्या खासदार सौ. उषा प्रकाश चौधरी यांनी लोकसभेत केली.

**देवदासींना भेडसावणाऱ्या समस्या :**

1) चिरंतन उत्पन्नाचे साधन उपलब्ध नसल्याने सामाजिक व आर्थिक समस्यांचा सामना करावा लागतो.

2) समाजातून तसेच कुटूंबातून भेदभावाची वागणूक दिली जाते.

3) शारिरीक व मानसिक अत्याचारांना सामोरे जावे लागते.

4) दैनंदिन उपजिवीकेचे स्थिर साधन नसल्याने जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो.

5) रोजगार संधीचा अभाव.

6) अन्यायाची दखल घेतली जात नाही.

7) परस्पर कलह निर्माण होऊन वरिष्ठ गुरुकडून सामान्यांची पिळवणूक होते.

8) वेश्या व्यवसायास प्रोत्साहन मिळते. त्यातून AIDS सारख्या महाभयंकर रोगाचा प्रसार होतो.

9) वृध्दापकाळात आधार मिळत नाही

**उपाय :**

1) देवदासीमुक्त गावाला शासनाने पारितोषिके दयावीत.

2) गावात देवदासी विधी होऊ नये यासाठी गावातील पोलीस पाटील, संरपंच यांना काही अधिकार शासनाने द्यावेत.

3) देवदासीचा ज्याच्याशी झुलवा लागतो त्यांच्या संपत्तीमधील वाटा देवदासीला मिळावा. तिच्यानंतर तिच्या मुलांना तो मिळावा.

4) ज्याच्यापासून देवदासीला मुले होतात त्यांचे नाव या मुलांना 'बाप' म्हणून देण्याची कायद्याने सक्ती व्हावी.

5) देवदासीशी विवाह करुन घेणाऱ्यास आर्थिक अनुदानाबरोबरच नोकरीमध्ये प्राधान्य द्यावे अथवा उदयोगधंदा उभारण्यास अर्थसाहाय्य करावे.

6) ज्या मंदिरात देवदासी विधी होतो अशी सर्व मंदिरे शासनाने ताब्यात घ्यावीत व देवदासी प्रथेसंबंधी माहितीपट तयार करुन तो खेडयापाड्यांतून दाखवावा.

7) प्रत्येक सरकारी दवाखान्यात मुला-मुलींच्या जटा कापण्याची मोफत सोय व्हावी.

8) देवदासी प्रथेविरुध सातत्याने चळवळ कणाऱ्या संघटनांना शासनाने अर्थसहाय्य व साधनसामग्रीच्या रुपाने रुपाने बळ द्यावे.

**निष्कर्ष** : सांगली जिल्ह्यातील देवदासींच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा अभ्यास या संशोधन अभ्यासावरून असा निष्कर्ष दिसून येतो की, देवदासींचा सामाजिक दर्जा, समाजातील त्यांचे स्थान अत्यंत खालच्या दर्जाचे आहे. त्यांना समाजात तुच्छ दर्जाची वागणूक दिली जाते. शिक्षणाच्या अभावामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. समाजातील काही घटकांकडून तसेच त्यांच्या समुदायातील लोकांकडून त्यांचे शारिरीक शोषण होते. देवीबरोबर लग्न लावल्यामुळे त्यांना काही वेळाने कुटुंब सोडावे लागते त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी सामाजिक सुरक्षिततेचा अभाव असल्याचे दिसून येते. उल्लेखनीय बाब म्हणजे देवदासीमध्ये आरोग्याच्या बाबतीत अनेक समस्या असलेल्या स्पष्ट जाणवतात. असुरक्षित लैंगिक संबंधामुळे AIDS चे प्रमाण मोठ्या प्रमाणात दिसून येते. उदरनिर्वाहासाठी राजगार उपलब्ध नसल्याने जोगवा मागून जगावे लागते. काही वेळा लोकांकडून त्यांना जोगवा दिला जात नाही त्याऐवजी अपशब्द ऐकावे लागतात. अशा प्रकारे देवदासींना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते त्यामुळे हा समाज दुर्लक्षित झालेला दिसून येतो. शासन स्तरावर विविध धोरणात्मक उपाय योजल्यास देवदासींच्या समस्यांची सोडवणूक व समावेशकतेच्या प्रवाहात देवदासींना आणण्यास निश्चित मदत होईल असे वाटते.

ISSN -2581-8848

**संदर्भ :**

1) उत्तम कांबळे (2018), देवदासी आणि नग्नपूजा, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.

2) आरती प्रभू (2012), जोगवा, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

3) जोगवा- मराठी चित्रपट

4) आज भी हवस का शिकार होने की मजबूरी, BBC NEWS- 10 डिसें. 2012

5) कृतीहा राजन (2017) 'Yours Story' लेख प्रकाशित
https://rgg7oo27ss2egtb6a2wiv7pqum-jj2cvlaia66be-yourstory-com.translate.goog/2017/04/devadasis-india